मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६२५४

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क्र. ६२५४

IRBK-0106254
IRBK-0106254

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का॰ वा
दा. क्र. ६२५४



# भक्त प्रल्हाद

— शिवराम वाशीकर

# भक्त प्रल्हाद

: लेखक :

शिवराम वाशीकर

हिंदी राजकारण; भिकारीण; जंजिऱ्याचा वेढा; जीवनक्रांति; काळाचा काळ; गणपतराव जोशी; विषप्रयोग; स्वराज्याच्या गाभाऱ्यांत; स्वराज्य-द्रोही; लढाईपूर्वी; भूषणदेवी; सामर्थ्याचा गर्व; . रामशास्त्री; गोवू, तुकाराम; नाट्यलहरी; ध्रुव बाळ; भक्त प्रल्हाद; संत जनाबाई, कच-देवयानी इ. पुस्तकांचा कर्ता.

IRBK-0106254

ठाकुरद्वार, मुंबई २

: १०५ :

★ ★ मूल्य चार आणे ★ ★ ★

# जयू आणि विजू

(दामले) (दामले)

## यांस

—शिवराम श्री. वाशीकर


: प्रकाशक :

ग. का. रायकर

झावबाची वाडी

ठाकुरद्वार : मुंबई २

प्रथमावृत्ति

२३ एप्रिल १९५०

चतुर्थावृत्ति

१ जानेवारी १९५७

: मुद्रक :

ज. दि. देसाई

राष्ट्र वैभव प्रेस

गिरगांव : मुंबई



## आभार

माझ्या विनंतीला मान देऊन मिनर्व्हा फिल्म कंपनीचे मालक श्री. सोहराब मोदी यांनीं आपल्या प्रसिद्ध "नरसिंह अवतार" चित्रपटां-तील प्रसंगांची छायाचित्रें दिलीं याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. अशा तऱ्हेनें हें छोटें पुस्तक सजवण्यास सहाय्य दिल्याबद्दल रा. अनंतराव गद्रे व रा. व्ही. बी. सोळस्कर यांचाही मी आभारी आहे.

शिवराम श्री. वाशीकर

# भक्त प्रल्हाद

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

## १ दैत्य देवाधिदेव झाला

पुराणकाळांतली ही गोष्ट आहे. त्या काळांत देव आणि दैत्य यांचें फार वैर होतें. कारण दैत्यांना राज्यलोभ फार होता. देवांचें राज्य बळकावून आपणच सर्व सत्ताधीश व्हावें अशी त्यांची मोठी हाव होती. देव आणि दैत्य दोघेही पराक्रमी होते. दोघांचींही तुंबळ युद्धें होत. पण जय नेहमीं देवांचाच होत असे. मग हे दैत्य ब्रह्मा, विष्णु किंवा महेश अशा कोणातरी महादेवाची तपश्चर्या करीत. आणि असा एकादा वर मागून घेत कीं, त्याच्यापुढें देवांचा पराक्रम कांहींच चालूं नये.

अशाच एका दैत्य कुळांतले हिरण्यकशिपू आणि हिरण्याक्ष हे दैत्य, सख्खे भाऊ भाऊ होते. देवांशीं त्यांचें घनघोर युद्ध चाललें होतें. हिरण्याक्षानें तर आपल्या पराक्रमानें देवांची अगदीं त्रेधा त्रेधा उडवून दिली होती. सगळे देव जीव घेऊन पळूं लागले होते. तेव्हां भगवान् श्रीविष्णु त्यांच्या मदतीला आले. हिरण्याक्षानें त्यांच्याशींही फार मोठें युद्ध केलें. त्या दिवशीं त्यानें एवढा दांडगा पराक्रम केला कीं, ‘ विष्णूला देखील हा जिंकणार ’ असें सगळ्यांना दिसूं लागलें. पण तसें झालें नाहीं. भगवान् विष्णूंची सरसी होऊं लागली. आपला पराभव होणार असें चिन्ह दिसतांच त्या हिरण्याक्षानें सगळी पृथ्वीच्या पृथ्वीच खाकुटींत मारून समुद्रांत उडी घेतली. पृथ्वीनें दीन होऊन हंबरडा फोडला. तेव्हां तिला वांचवण्यासाठीं भगवान् विष्णूंनीं रानडुकराचें

( वराह ) रूप घेतलें. हिरण्याक्षाच्या पाठोपाठ त्यांनीं समुद्रांत मुसंडी मारली. तेथेंही दोघांचें खूप मोठें युद्ध झालें. त्या युद्धांत विष्णूंनीं हिरण्याक्षाला ठार मारलें; आणि त्याच्या मगरमिठींतून पृथ्वीची सुटका केली. सगळ्या देवांना मोठा आनंद झाला.

भगवान विष्णूंच्या याच रूपाला "वराह-अवतार" असें म्हणतात. दुष्टांच्या हातून देव-ब्राह्मणांचें रक्षण करण्यासाठीं भगवान् विष्णूंनीं जे दहा अवतार घेतले त्यांतला हा तिसरा अवतार आहे.

भगवान् विष्णूंनीं आपल्या धाकट्या भावाला ठार मारलें हें पाहून हिरण्यकशिपूला फार राग आला. हिरण्यकशिपू मंदार



पर्वतावर गेला. तेथें त्यानें ब्रह्मदेवाची शंभर वर्षें तपश्चर्या केली. ब्रह्मदेव प्रसन्न झाला आणि म्हणाला "तुझ्या तपश्चर्येनें मी प्रसन्न झालों आहे. तुला पाहिजे तो वर माग."

हिरण्यकशिपूनें वर मागितला.

"घरीं किंवा दारीं, (घराबाहेर) दिवसा किंवा रात्रीं, मनुष्याकडून किंवा पशूकडून, शस्त्रानें, किंवा अस्त्रानें, सजीवाकडून किंवा निर्जीवाकडून, जमिनीवर किंवा पाण्यावर मला कधीं मृत्यू येऊं नये."

ब्रह्मदेव म्हणाला–" हिरण्यकशिपू, तूं मागतोस ते वर कधींही, कोणालाही मिळाले नाहींत; पण तुझ्या तपश्चर्येवर मी प्रसन्न असल्यामुळें तेही वर मी तुला देतों."

अशा तऱ्हेनें कधींही, कोठेंही, केव्हांही, व कशानेंही मरण येऊं नये असा हिरण्यकशिपूनें वर मिळवला. आतां त्यांची खात्री झाली कीं आपल्या भावाचा सूड घेण्याची, म्हणजे विष्णूला ठार मारण्याची आपली महत्त्वकांक्षा सहज पार पडणार. आधींच दैत्य, त्यांत असा हा अमरपणाचा वर मिळालेला, मग काय विचारतां? त्या दैत्याच्या उन्मत्तपणाला भराभर मद चढूं लागला. त्यानें तीनही लोक जिंकले देव, मानव, गंधर्व सगळ्यांचा पराभव



करून दाही दिशांवर त्यानें आपली सत्ता बसवली. इंद्राच्या

अमरावतींतील वैभवपूर्ण राजवाड्यांत आतां तो राहूं लागला. ब्रह्मा, विष्णु, आणि महेश या तीन देवांखेरीज सगळे देव व सगळे लोकपाल, त्याच्या सेवेला हजर होऊं लागले. ऋषी, ब्राह्मण त्याच्याच नांवानें यज्ञ करूं लागले आणि अशा तऱ्हेनें तो दैत्य देवाधिदेव झाला.

## २ ★ ★ गुरुजींच्या आश्रमांत

याच सुमारास हिरण्यकशिपूची पट्टराणी कयाधू प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याची तेजस्वी दिव्य कांति आणि त्याचें प्रभावी रूप पाहून हिरण्यकशिपूला अतिशय आनंद झाला. आपल्या उत्कर्षाचें पाजळलेलें शिखर अखंड तेवत ठेवणारा हा पुत्र [illegible] वाटे[illegible] त्याचा कांहीं पहिलाच मुलगा नव्हता तरीही त्यानें तीनही लोकांत पुत्रजन्माचा उत्सव केला. त्याचें नांव प्रल्हाद ठेवलें.

प्रल्हाद आपल्या गुणांनीं सगळ्यांना आवडूं लागला. तो शिकण्यासारखा मोठा झाला तेव्हां हिरण्यकशिपूनें त्याला शंड आणि अमर्क नांवाच्या गुरुजींकडे शिकण्यास पाठवलें.

शंडामर्क गुरुजींच्या आश्रमांत उंच जागीं हिरण्यकशिपूची एक भली मोठी मूर्ति ठेवली होती. कारण आतां तोच देवांचाही देव झाला होता. सर्व त्रैलोक्य त्याचेच गुण गात होते. शंडामर्क गुरुजी रोज सकाळीं आपल्या शिष्यांसह प्रार्थना करीत.

"हे देवाधिदेव हिरण्यकशिपू महाराज, पूर्वी पृथ्वीवर मनुष्य, स्वर्गावर इंद्र आणि पाताळावर दैत्य राज्य करीत होते. पण तुम्ही आपल्या पराक्रमानें स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ हे तीनही लोक जिंकले. दाही दिशांना दैत्यांचें एकछत्री साम्राज्य केलें. आपल्या त्रिखंडांतल्या एकाच कर्तुमकर्तुम शक्तीला आ त्रिवार प्रणाम असो."

आपल्या वडलांचा हा पराक्रम ऐकून प्रल्हादही आपल्या वडलांची प्रार्थना करी.



"बाबा, मी तुमचा आवडता मुलगा प्रल्हाद. मला तुम्ही आशिर्वाद द्या, आणि आमच्या दैत्य कुळाचं नांव असंच गर्जत ठेवायला मला समर्थ करा."

असे कांहीं दिवस गेले. पहिल्यानदांच आईपासून इतक्या दूर राहिल्यामुळें, केव्हां एकदां आईला भेटेन असें प्रल्हादाला झालें होतें. आणि प्रल्हादही पहिल्यानदांच इतक्या दूर गेल्यामुळें त्याला केव्हां एकदां भेटेन असें कयाधूलाही झालें होतें. एक दिवस तिनें हिरण्यकशिपूला सांगितलें.

"प्रल्हादाला जाऊन फार दिवस झाले. त्याला एकदां भेटायला बोलवावं."

हिरण्यकशिपूनें तें लागलीच कबूल केलें. त्याच दिवशींच त्यानें गुरुजींच्या आश्रमाकडे रथ पाठवून दिला.

## ३ पितृप्रेम–पुत्रद्रोह

आई–वडलांना भेटण्यास प्रह्लाद अमरावतीच्या राजधानीकडे निघाला. रस्त्यांत त्याला ठिकठिकाणीं हिरण्यकशिपूच्या मूर्ति उभारलेल्या दिसत होत्या. सगळे लोक त्या मूर्तींची निरनिराळ्या प्रकारांनीं प्रार्थना करीत होते. तें सगळे पाहून प्रल्हादाला अतीशय आनंद झाला. अशा पराक्रमी वडलांच्या पोटीं आपला जन्म झाला म्हणून त्याला धन्यताही वाटली.

त्याच धन्यतेच्या आनंदांत तो आपल्या राजवाड्यांत आला. कयाधू तर त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. आई दिसल्यावरोवर

"आई ग, आई ग, मी आलों बघ"

असें म्हणत तो तिच्याकडे धांवतच गेला. कयाधूनें त्याला उचलून घेतला. त्याच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली.



"मी कित्ती कित्ती वाट पहात होतें या बाळाची!"

"होय काय?-कां? माझी तूं इतकी कां वाट बघत होतीस आई?"

प्रल्हादानं इतक्या लाडिकपणानें विचारलें कीं, त्यांत तो स्पष्ट जाणवीत होता 'तुला भेटायला तुझ्यापेक्षां मीच जास्त अधीर होतो.' त्याच्या अंतःकरणांतला भाव त्याच्या आईला जणू समजलाच. तिनेंही त्याला तशाच लाडिक स्वरानें उत्तर दिलें.

"तूं किनई प्रल्हाद, मला फार फार आवडतोस बघ."

"मी तुला इतका कां आवडतो आई?"

"कां म्हणजे? माझा मुलगा आहेस तूं 'कयाधू त्याला सांगूं लागली' आमच्या कुळाचं भूषण आहेस तूं, आपल्या वडलांचं नांव मोठं करणार आहेस—"

"हो—हो—'प्रल्हाद मध्येंच म्हणाला' करणारच मी बाबांचं नांव मोठं - खरंच आई—बाबा कित्ती मोठ्ठे आहेत नाहीं?"

"किती मोठे आहेत?" कयाधूनें हंसऱ्या मुद्रेनेंच पण अभिमानाच्या कौतुकानें विचारलें.

"फार फार-फार—अगदीं अगदीं फार मोठे आहेत."

"हंऽअंऽऽ—कुणी सांगितलं तुला हें?"

"सांगायला कशाला पाहिजे? मी बघतच आलों कीं! सगळे लोक बाबांची पूजा करतात, त्यांची प्रार्थना करतात, त्यांचा जयघोष करतात—आणि—आणिक किनई आई, एका देवळांत तर बाबांना उभंच केलं होतं."

"उभं केलं होतं?" कयाधूनें विचारलें.

"हो—हो उभं केलं होतं—कसं दाखवूं तुला?"

असें म्हणत प्रल्हाद आईच्या मांडीवरून टुणदिशी उडी मारून दूर झाला चेहरा गंभीर केला, गाल फुगवले, डोळे मोठे केले, आणि मोठ्या ऐटींत उभा राहिला. तें पाहून कयाधूला त्याचें कोण कौतुक वाटलें. तिनें त्याला ओढून जवळ घेतला आणि ती त्याचे पटापट् मुके घेऊं लागली.

"हो—हो—हो—त्याला सगळाच खावून टाकूं नका—थोडा-तरी आम्हांला शिल्लक असूं दे! माझाही तो मुलगा आहेच कीं!" असें म्हणत हिरण्यकशिपू प्रल्हादाला भेटण्यासाठीं आला. त्याला पहातांच प्रल्हाद त्याच्याकडे धांवत जात म्हणाला.

"हो तर मी तुमचाच आहे बाबा!"

"अरे लबाडा!" कयाधू म्हणाली.

पण तो आईला जसा बेधडक भेटला तसा वडलांना भेटला नाहीं. धांवतां धांवतां तो मध्येंच थबकला. चर्या गंभीर केली आणि रोज गुरुजींच्या आश्रमांत तो जी प्रार्थना करीत होता तीच प्रार्थना, त्यानें त्याच आदरानें इथंही केली. प्रार्थना संपल्यावर त्यानें हिरण्याकशिपूला साष्टांग नमस्कार घातला. तें सगळें पाहून हिरण्यकशिपूला अतिशय समाधान झालें. त्यानें अपत्य-प्रेमानें त्याला उचलून घेतलें. तो त्याला म्हणाला.

"माझा आशिर्वाद आहे तुला. माझ्या कुळाचं भूषण हो. माझ्यासारखंच सामर्थ्य मिळव. सामर्थ्य असलं तर सत्ता सहज मिळते. सामर्थ्य आणि सत्ता हीं आपलीं कुळभूषणं आहेत. त्याच जोरावर मी देवांचं देवपणही हिरावून घेतलं. त्याच जोरावर मी समर्थ देवाधिदेव झालों. तूंही तसाच हो. मी मिळवलेलं राज्य सांभाळ. तें कसं सांभाळावं हें शिकवण्यासाठींच मी तुला गुरूजींकडे पाठवलं आहे. राजनीतिशास्त्रांत ते तुला निपुण करतील."

यावर प्रल्हाद किंचित् विचारांत पडला. त्यानें एकदां हिरण्य-कशिपूकडे पाहिलें आणि म्हटलें.

"असं-असं ते शिकवतात ती राजनीति होय? तें कांहीं नीटसं समजत नाहीं मला; पण-पण किनई बाबा, मी मात्र अगदीं तुमच्यासारखं व्हायचं ठरवलंय."

अनुक्रम ......
विभाग ......
नों. दि. ......
...वाचनालय

"अरे लबाडा—" कौतुकानेंच पण हिरण्यकशिपूकडे हंसत मुखानें पहात कयाधू म्हणाली.

हिरण्यकशिपूलाहि प्रह्लादाच्या त्या म्हणण्याचें कौतुक वाटलें. तोही तशाच कौतुकाच्या स्वरांत म्हणाला.

"हंऽअंऽ म्हणजे कसा रे ?"

दोघांच्याही कौतुकानें अतिशय आनंदीत झालेला प्रल्हाद आई-कडे अर्धस्मित मुद्रेनें पहात कांहींशा लाडिक स्वरांत म्हणाला.

"सांगू ? —आई—सांगू बाबांना ?

"होऽओ. म्हणजे मलाही समजेल."

"आई म्हणत होती—महाराजांनीं—म्हणजे तुम्ही बरं का बाबा, फार मोठी तपश्चर्या केली. आणि ब्रह्मदेव प्रसन्न करून घेतला—"

"हो—हो—" हिरण्यकशिपूनें हंसत कयाधूकडे पाहिलें. तिनेंही सलज्जपणें विनयानें खालीं मान घातली. हिरण्यकशिपु पुढें म्हणाला.

"आणि त्याच्याच वरानें मी इतका समर्थ झालों आहे."

"होयना ?" खात्री झाल्याचा आनंद प्रल्हादाच्या चर्येवर दिसूं लागला. तो पुढें म्हणाला.

"मी सुद्धां तसंच करायचं ठरवलंय!"

"म्हणजे ? तपश्चर्या करायचं ठरवलं आहेस तूं ?" कयाधूनें हंसत चेष्टेच्या सुरांत त्याला विचारलें.

"हो! तपश्चर्या करायचं ठरवलंय." प्रह्लादानें मात्र आईच्या चेष्टेकडे लक्ष न देतां हिरण्यकशिपूकडे पहात गंभीर मुद्रेनें ठासून सांगितलें.

तें ऐकून हिरण्यकशिपू खूप मोठ्यानें हंसला. हंसतां हंसतां तो म्हणाला.

"वेडा नाहींतर—"

आईच्या चेष्टेनें आणि हिरण्यकशिपूच्या तसाच हंसण्यानें प्रल्हाद किंचित् बावरला. त्यानें दोघांकडेही एकेकदां पाहिलें आणि पहिल्यासारख्याच आत्मविश्वासाच्या स्वरानें म्हटलें.

"कां? वेडा कां ? मी लहान आहे म्हणून? माझ्यासारख्या लहान मुलांना देखील तपश्चर्या करायची युक्ति समजली आहे मला!"

"हंऽअं? कोणती युक्ति ती?" हिरण्यकशिपूनें विचारलें.

"अगदीं सोपी आहे' 'प्रल्हाद एखाद्या अनुभवी माणसाप्रमाणें सांगूं लागला.' ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घ्यायला तुम्हांला अरण्यांत जावं लागलं, आणि उपासी-तापासी राहून खडतर तपश्चर्या करावी लागली. पण असल्या देवाची तपश्चर्या करणार नाहीं मी! मी दुसऱ्याच एका देवाची तपश्चर्या करणार आहे."

बोलतां बोलतां प्रल्हादाचे हात जोडले गेले. तो कांहींसा तल्लीन होऊन पुढें सांगूं लागला.

"नुसतं ध्यान-गुणगान-कीर्तन-अरण्यांत न जातां-इथेंच-राजधानींतच-वाड्यांतच राहून नव-विधा-भक्तीनें मी तपश्चर्या करणार-आणि भक्तांसाठींच लोभी असलेला शेषशाई भगवान् विष्णु प्रसन्न करून घेणार—"

"प्रल्हाद—"

विष्णूचें नांव ऐकतांच हिरण्यशिपू एकदम खवळला. तो मोठ्यानें ओरडून म्हणाला.

"प्रल्हाद-जीभ हासडून काढीन पुन्हां त्या विष्णूचं नांव घेतलसं तर. तो माझा शत्रू आहे-तुझा शत्रू आहे...आमच्या दैत्य कुळाचा शत्रू आहे तो."

"भगवान् विष्णु कुणाचाही शत्रू नाहीं, बाबा."

"त्यानें माझ्या भावाला-तुझ्या काकाला ठार मारलं आहे.

मीही त्याला ठार मारणार आहे आणि हिरण्याक्षाचा सूड घेणार आहे."

"दुष्ट माणसाखेरीज तो कोणालाही ठार मारीत नाहीं. आणि त्याला कोणीही ठार मारूं शकत नाहीं. पण अगदीं साधा माणूस-माझ्यासारखं पोरही त्याला जिवंत जिंकील. तें फक्त भक्तीच्या जोरावर."

"तर मग त्याच्या या भक्ताला मीच जिवंत ठेवणार नाहीं. माझा मुलगा म्हणून मी तुझी गय करणार नाहीं. माझ्या शत्रूचे मित्र तेही माझे शत्रूच. सेवक या. आत्तांच्या आत्तां याला माझ्या डोळ्यांपुढून न्या-आत्तांच्या आत्तां याचा कडेलोट करा."

## ४ ★ ★ कडेलोट केला

रक्तानें तुडुंब भरलेल्या शिरांवर अकस्मात कसला तरी आघात व्हावा, आणि पिचकारी मारल्याप्रमाणें चहूंकडे रक्ताच्या चिळकांड्या उडाव्यात त्याप्रमाणें आतां प्रल्हादाची स्थिति झाली होती. परमेश्वरभक्तीनें तुडुंब भरलेल्या त्याच्या हृदयावर हिरण्यकशिपूच्या विष्णुद्रोहाचा अकस्मात् आघात झाला. त्याबरोबर त्याच्या भक्ति-नसा फुटल्या आणि त्या चहूंबाजूंनीं वाहूं लागल्या. कारण परमेश्वरभक्तीच्या अपार संपत्तीनें तो गर्भ-श्रीमंतच होता.

भगवान विष्णूला ठार मारण्यासाठीं सामर्थ्य मिळावें म्हणून हिरण्यकशिपू मंदार पर्वतावर तपश्चर्या करायला गेला होता. सगळ्या दैत्यांना चांगले वद्डून काढायला ही संधि फार उत्तम आहे असें इंद्राला वाटलें. त्यानें सगळ्या देवदेवांना जमवून दानव राज्यांवर हल्ले चढवले. दानव सैन्याची त्यानें अगदीं दाणादाण उडवून दिली. राजवाडे लुटून लूटही खूप मिळविली. हिरण्यकशिपूच्या पट्टराणीला म्हणजे कयाधूला कैद करून इंद्र तिला

स्वर्गांत घेऊन निघाला होता. रस्त्यांत त्याला नारद ऋषी भेटले. ते म्हणाले.

"अरे-अरे हें काय खुळ्यासारखं करतोस ? ही स्त्री आहे—परस्त्री आहे—पतिव्रता आहे—"

"होय-होय. मला माहीत आहे. ही महाराणी पतिव्रता कयाधू आहे. मी तिला पळवून नेत नाहीं. किंवा तिला ठार मारण्यासाठीं नेत नाहीं. ती गरोदर आहे, देवांचा द्वेष्टा, प्रत्यक्ष भगवान् विष्णूला ठार मारण्यासाठीं हिरण्यकशिपू तपश्चर्या करीत आहे. त्या दुष्ट दैत्याचा गर्भ तिच्या पोटांत वाढतो आहे. ती प्रसूत झाली म्हणजे तिच्या पुत्राचा वध करून तिला मी सुखरूप परत आणून पोंचवीन."

"कयाधूचा पुत्र तुझ्या हातून मरणार नाहीं."

"नुक्तं जन्मलेलं पोर इंद्राच्या हातून मरणार नाहीं म्हणता ? नारद ऋषि, कुणाला तरी खरं वाटेल हें ?"

"कुणाला खरं वाटो न वाटो, तें खरं आहे. कयाधूचा हा मुलगा नरनारायण भगवान् विष्णूचा परमभक्त आहे. तो तुझ्या वज्रानंही मरणार नाहीं. तिला तूं सोडून दे."

नारदांच्या या सांगण्यानें इंद्रानें कयाधूला मुक्त केलें होतें. मग नारदांनीं तिला आपल्या आश्रमांत आणून ठेवलें. आपली प्रसूति इच्छित वेळीं व्हावी आणि तोपर्यंत कितीही काळ गेला तरी गर्भाचें संरक्षण व्हावें असा तिनें नारदऋषीकडून वर मागून घेतला. मध्यंतरींच्या काळांत नारद ऋषींनीं कयाधूला धर्म, परमेश्वरभक्ति आणि मुक्ति यांची फार चांगली शिकवण दिली होती. तें सगळें ज्ञान सहजच संस्कार रूपानें तिच्या गर्भावर बिंबत होतें. तो गर्भ म्हणजे प्रह्लाद होय.

अशा तऱ्हेनें प्रह्लादाच्या हाडींमांसीं भिनलेलें तें भक्ति-निवृत्ति ज्ञान उसळून बाहेर पडण्याची आत्तांपर्यंत संधि आली नव्हती.

विष्णु-द्रोहाचें निमित्त होण्याबरोबर तें उसळलें. देहांत करणाऱ्या हिरण्यकशिपूच्या त्या शिक्षेनें प्रह्लाद भ्याला नाहीं, कीं परमेश्वर-रूप पित्यावर रागावला नाहीं. नारायण स्तुतीची त्याची वाणी आतां गंगेच्या प्रवाहासारखी वाहूं लागली. त्याच्या "नारायण— नारायण" नामघोषानें तो राजवाडा आतां घुमूं लागला. त्यांतच हिरण्यकशिपूची कठोर आज्ञा थाड् थाड् ऐकूं येत होती.

"माझ्यापुढून न्या याला, फरफटत न्या, कडेलोट करा याचा!"

पण नारायणाच्या त्या नामघोषांत प्रह्लाद आतां इतका तल्लीन झाला होता कीं, त्या राक्षस दूतांनीं त्याला कोठें नेलें, किती दूर नेलें, खांद्यावरून नेलें कीं, फरफटत नेलें हें त्याला कांहींच समजलें नाहीं. राजधानीपासून दूर, फार दूर असलेल्या एका डोंगरावर त्यांनीं त्याला आणलें होतें. आकाशाला पोंचणाऱ्या त्या डोंगराचा एक कडा इतका खोल तुटला होता कीं, खालीं वाकून पहाणाऱ्याला पहातांच चक्कर यावी.

त्या राक्षसदूतांनीं त्या कड्याखालीं पाहिलें नाहीं. अपराध्यांचा कडेलोट करण्याच्या त्यांच्या नेहमींच्या सरावाप्रमाणें त्यांनीं प्रह्लादाला एकाद्या कोंकरासारखा उचलला आणि कड्यावरून खालच्या खोल दरींत फेंकून दिला.

## ५ * सत्ताधारी माणसें मुलांनाच भितात

पण परमेश्वर भक्तांचा मोठा लोभी आहे. त्यानें बालभक्त प्रह्लादाचा वध करूं दिला नाहीं. पारिजातकाचें नाजूक फूल सोसाट्याच्या वाऱ्यानें भिरकावून द्यावें पण दरींतल्याच एकाद्या आम्रवृक्षानें तें झेलावें, त्याप्रमाणें भगवान् विष्णूंनीं त्या दरींत प्रगट होऊन प्रह्लादाला आपल्या हातावर अगदीं अलगद् झेललें. नाम-घोषाच्या तंद्रीत प्रह्लादाला हें कांहींच समजलें नव्हतें. मग विष्णूंनीं

त्याच्या तोंडावरून हात फिरवला. तो सावध झाला. डोळे उघडून त्यानें चहूंकडे पाहिलें. निरनिराळ्या प्रकारची मोठमोठीं झाडें आणि त्याहीपेक्षां उंचच उंच कडा पाहून तो घोटाळ्यांत पडला. कारण आत्तांच आपण आपल्या राजवाड्यांत वडलांशीं बोलत होतों अन् एवढ्यांत अशा अरण्यांत कसे आलों हें त्याला समजेना. एवढ्यांत भगवान् विष्णूची तेजस्वी, हंसतमुख चर्या त्याला दिसली. तो चकित झाला. त्यांच्याकडे स्थिर दृष्टीनें पहात त्यानें भगवान् विष्णूलाच विचारलें.



" म्हणजे ? कोण तुम्ही ? नारद ऋषींनीं भगवान् विष्णूचें वर्णन केलें होतें, अगदीं हुबेहुब तस्से दिसतां तुम्ही-खरंच तुम्ही भगवान् विष्णू आहां ? "

उमलणाऱ्या कमळाप्रमाणें भगवान् विष्णूंची चर्या उमलली. त्यांनीं त्याच्या पाठीवर हात फिरवीत स्मितपूर्वक मानेनेंच "होय" म्हटलें. त्याबरोबर प्रल्हादाला कोण आनंद झाला. सगळें बाळपण त्याच्या आंगांत संचारलें. एकाद्या वासरासारखी त्यानें टाणदिशी उडी मारली आणि जणूं काय आनंदानें नाचतच तो म्हणाला.

"विष्णु-भगवान् विष्णु-नरनारायण-शरण येणाऱ्या कोणालाही जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडवणारा लक्ष्मीपति ! ऋषीमुनींनाहीं दुर्लभ, क्षीरसागरनिवासी भगवान् मी प्रत्यक्ष पहातो आहे ! धन्य—धन्य—आतां मी तुम्हांला सोडणार नाहीं-येथेंच मला मुक्ति द्या. येथेंच माझी जीवनज्योत आपल्या जीवनज्योतींत मिळवून घ्या !"

भगवान् विष्णु हंसत म्हणाले, "मी तुझ्यावर प्रसन्न आहे पण तुला मुक्ति देणार नाहीं. कारण तुझ्याकडून अगोदर एक मोठी कामगिरी करवून घ्यायची आहे मला !"

"माझ्याकडून—? 'प्रल्हाद आश्चर्यचकित होऊन म्हणाला' माझ्याकडून मोठी कामगिरी करवून घेणार आहेत भगवान् ?"

"होय."

"कसली ?"

"लोकांचा उद्धार करण्याची ! दैत्यांच्या जुलमानें भयभीत होऊन आपलीं धर्मकर्मं सोडलल्या लोकांना निर्भय करण्याची, त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याची ।"

"अबब-! भगवन्, भगवन्, काय हें ?-मी एवढंसं पोर-"

'तुला माहीत नाहीं प्रल्हाद, हिरण्यकशिपूसारखे सार्वभौम राजे, कर्तुमकर्तुम शक्तीचीं सर्व सत्ताधारी माणसें तुझ्यासारख्या मुलांनाच भितात. शस्त्रानें माणूस मारतां येतो पण मुलांच्या मनांत निर्माण झालेलं चैतन्य कोणालाही आणि कशानेंही मारतां येत नाहीं."

प्रल्हादाला अधिकच आश्चर्य वाटलें. तो अगदीं अचंब्यानें विष्णूच्या तोंडाकडे पाहूं लागला. तें जाणून किंचित् हंसरे तोंड करीत विष्णु म्हणाले.

" हिरण्यकशिपूसारखीं माणसं मुलांना भीत नाहींत, तर त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या चैतन्याला, कशालाही, कोणालाही न भिणाऱ्या त्यांच्या धैर्याला तीं भितात. तें चैतन्य आणि तें धैर्य तूं मुलांत निर्माण कर. दुष्टांचा संहार करून, गांजलेल्या त्रैलोक्याचा उद्धार करायला तूं मला मदत कर. माझा तुला आशिर्वाद आहे."

बोलतां बोलतां भगवान् विष्णूंनीं त्याच्यावर वरदहस्त ठेवला. ते एकदम अदृश्य झाले. प्रल्हाद क्षणभर दिङ्मूढ झाला, पण क्षण दोन क्षणांतच तो भानावर आला. आतां तो पहिल्यापेक्षांही चैतन्य-पूर्ण उत्साहानें चालूं लागला. जणूं काय परमेश्वरानें आपल्यावर सोपवलेली कामगिरी पार पाडण्यासाठींच तो आवेशानें चालूं लागला होता.

## ६ ★ ★ जगाला जिंकणारी शक्ति

जातां जातां प्रल्हादाच्या मनांत विचार आला कीं, " आतां अगोदर पाठशाळेंतच जावें. तिथें आपले सगळे मित्र आहेत. आपल्यावर त्यांचें प्रेम आहे. आपण सांगूं तें ते ऐकतील. त्यांचीं मनें नव्या चैतन्यानें भरतील. ते चांगले धीट होतील. ते आणि आपण मिळून पुन्हां पुढें जाऊं. "

असा विचार करीत करीत प्रल्हाद चालला होता. तोंच पांच पंचवीस लोकांच्या एकमुखी प्रार्थनेचा गंभीर स्वर त्याला ऐकूं आला. तो एकदम थबकला. ज्या बाजूनें तो स्वर येत होता त्या बाजूनें कांहींशा त्रस्त मुद्रेनें तो झप् झप् पावलें टाकूं लागला. तो जसजसा पुढें पुढें जाऊं लागला तसतसा तो स्वर त्याला अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला.

" हे देवाधिदेव हिरण्यकशिपू; तूंच-ब्रह्मा, तूंच विष्णु, तूंच रुद्र, तूंच इंद्र, तूंच अग्नि, चराचराचा शास्ता तूंच—"

ती त्याच्याच वडिलांची स्तुति होती, तरी प्रल्हादाला आतां ती रुचली नाहीं. तो एकदम ओरडला.

" हां-हां-हां—"

तें एक प्रशस्त देऊळ होतें. देवळाचा सभामंडप लोकांनीं भरून गेला होता. देवळांत मध्यभागीं सिंहमुखी व्यासपीठावर हिरण्यकशिपूची भव्य मूर्ति होती. व्यासपीठासमोर दोन गृहस्थ उभे होते, व बाकीचे सगळे लोक दुतर्फा उभे होते. ते दोन लोक प्रार्थना सांगत होते, व बाकीचे लोक ती म्हणत होते. त्याच वेळीं प्रल्हाद मोठ्या आवेशानें आंत घुसला आणि मध्येंच म्हणाला.

" हां-हां-हां—"

दरडावणीचा तो प्रभावी शब्द ऐकून सगळ्यांनीं चमकून मागें पाहिलें. पहिल्यासारख्याच प्रभावी सुरांत प्रल्हाद पुढें म्हणाला.

" स्तुति करायची तर ती परमेश्वराची करावी. माणसाची स्तुति कधींहि करूं नये."

व्यासपीठासमोर उभे राहून सगळ्यांना प्रार्थना सांगणाऱ्या त्या दोन मुख्य मनुष्यांपैकीं एक मनुष्य पुढें सरसावला आणि म्हणाला.

" आम्ही सामान्य माणसाची स्तुति करीत नाहीं. आपल्या पराक्रमावर देवाधिदेव झालेल्या समर्थ हिरण्यकशिपूंची स्तुति करतों आहों युवराज!"

" माणूस कितीही पराक्रमी झाला तरी परमेश्वराची बरोबरी त्याला करतां येणार नाहीं. परमेश्वराचं व्यापकत्व, त्याची कर्तुम-कर्तुम शक्ति मनुष्याला कधींही मिळवतां येणार नाहीं."

त्यावर तो मनुष्य हंसून म्हणाला.

" आम्हीसुद्धां एके काळीं असंच म्हणत होतों."

" मग ?—"

" परमेश्वरानंच आमची खात्री केली कीं, आमचा तो भ्रम होता."

" तो कसा ? " प्रह्लादानें पुन्हां उत्सुकतेनें विचारलें.

तो मनुष्य कांहींशा अनादराच्या धिक्कार वाणीनें म्हणाला.

" ज्याला आपल्या भक्तांचं रक्षण करतां येत नाहीं, तो कसला परमेश्वर, कसलं त्याचं सामर्थ्य ! "

" छेः छेः छेः 'प्रह्लाद मध्येंच म्हणाला' तुमचा अगदीं गैरसमज झाला आहे. मनुष्यावर ओढवणाऱ्या कोणत्याही संकटांतून सोडवायला एका परमेश्वराखेरीज कोणीही समर्थ नाहीं. भगवान् विष्णूच्या मुखांतलं हें वाक्य आहे असं समजा. तुम्हीं त्याचीच भक्ति करा. तुमच्या भक्तिबळानं तुमचं रक्षण करण्याचं त्याला सामर्थ्य द्या. प्रलयकाळांतून सुद्धां तोच तुमचं रक्षण करील."

हें बोलत असतांना प्रल्हादाची चर्या इतकी तेजस्वी आणि इतकी गंभीर झाली होती कीं, प्रत्यक्ष भगवान् विष्णूच बोलतो आहे असें त्या सगळ्यांना वाटलें. प्रल्हादाशीं बोलायला आलेल्या त्या मनुष्यानें एकदां सगळ्यांकडे पाहिलें. त्यांनीं त्याचा अर्थ ओळखला. त्यांनींही त्याला तशाच संकेताच्या नजरेनें उत्तर दिलें. मग तो प्रल्हादाला म्हणाला.

" आमचा देखील तोच पुरा पुरा विश्वास आहे राजकुमार ! आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां आम्हां या देव-गंधर्वांच्या दीन हांकेला भगवान् विष्णु " ओ " देणार. "

" म्हणजे ? तुम्ही हे सगळे देव गंधर्व आहांत ? " प्रल्हादाला विलक्षण आश्चर्य वाटलें.

" होय-होय युवराज, 'स्वतःचा धिक्कार करीत तो आवेशानें सांगू लागला' आम्ही हे सगळे देव-गंधर्व आहोंत. 'त्राहि हिरण्यराज' 'त्राहि हिरण्यराज' अशी दीनवाणी करुणा भाकीत

स्वर्गातून पळ काढणारा हा, मी देवांचा सेनापति इंद्र आहे. हा विश्वकर्मा, हा बुध, हा चंद्र, हा सूर्य, हा चित्ररथ, हे ऋषि, हे तपस्वी सगळे सगळे इथं कुत्र्याचं जिणं जगतों आहोंत—आमचा आम्हांलाच संताप येतो. पण करणार काय-हातांत हत्यार नाहीं—आंगांत बळ नाहीं—"

"हां—हां-'प्रल्हाद मध्येंच म्हणाला' जुलुमाच्या आघातानं तुम्ही फक्त भांबावले आहांत. त्या भांबावण्यांत तुम्ही आपले विचार गुलाम केले आहेत. मनाची आणि वाणीची गुलामगिरी अगोदर सोडा म्हणजे शारीरिक गुलामगिरी तोडायला वेळ लागणार नाहीं. विनाशस्त्र दुबळ्या माणसांजवळ अशी एक मोठी, अतिशय मोठी शक्ति आहे कीं, तिच्या प्रभावानं तुम्ही हिरण्यकशिपू महाराजांनाच काय पण सगळ्या जगाला जिंकाल."

सगळे देव आश्चर्यानें चमकले. ते प्रल्हादाकडे आश्चर्याच्या आतुरतेनें पाहूं लागले. इंद्रानें अगदीं अधीरपणें विचारलें.

"कोणती ? कोणती शक्ति ती राजकुमार ?"

प्रल्हादानें किंचित् हंसून पण आत्मविश्वासाच्या गंभीर अशा निश्चयी स्वरांत उत्तर दिलें.

"आत्मिक बळ ! त्या बळावर तुम्हाला मृत्यूचंही भय वाटणार नाहीं. ज्यानं मृत्यूच्या भयाला जिंकलं त्यानं जग जिंकलं. या आत्मिक बळानं तुम्ही स्वतःचंही सामर्थ्य वाढवा आणि तुम्हांला सहाय्य करणाऱ्या परमेश्वराचंही सामर्थ्य वाढवा. दुबळ्या मनुष्यांना सहाय्य करण्याचं परमेश्वराचं सामर्थ्य वाढतं, तें त्या मनुष्याच्या भक्तीनं वाढतं ! पूर्ण श्रद्धेनं आपण त्याची भक्ति करूंया—त्याच्या नांवाचा जयघोष करून त्याला हांक मारूंया—नारायण-नारायण—"

प्रल्हादानें "नारायण-नारायण" अशा मोठ्या पण भक्तिभावानें

रुद्ध झालेल्या स्वरांत म्हटलें कीं ते सगळे देव-गंधर्वही भरून आले. त्यांनींही त्याचाच तशाच स्वरांत प्रतिध्वनि केला.

" नारायण-नारायण "

इंद्र गहिंवरून म्हणाला, " राजकुमार, आपल्या मुखानं प्रत्यक्ष भगवानच बोलतो आहे, असं आम्ही म्हणतों. आम्हांला मार्ग दिसला-आम्हांला बळ मिळालं—आपल्या रूपानं प्रत्यक्ष विष्णूनं आम्हांला दर्शन दिलं.—"

म्हणतां म्हणतां इंद्रानें नम्र होऊन हात जोडले. सगळ्यांनीं इंद्राप्रमाणेंच नम्र होऊन प्रल्हादाला हात जोडले.

## ७ ★ ★ जिभाच छाटून टाकीन

प्रह्लाद तिथून निघाला तो आश्रमांत आला. तो तिथें आला त्यावेळीं गुरुजी प्रार्थना सांगत होते. विद्यार्थी ती म्हणत होते.

" हे जगदाधार, सर्व शक्तिमान् राजाधिराज महाराज हिरण्यकशिपू आम्ही तुम्हांला शरण आलोंय. आमचं रक्षण करा. आम्हाला बुद्धि द्या. आम्हांला समर्थ करा. "

प्रल्हादानें ती प्रार्थना म्हटली नाहीं. आपल्या विद्यार्थी मित्रांनीं ती प्रार्थना म्हणावी असेंही त्याला वाटलें नाहीं. पण त्या वेळीं तो कांहीं बोलला नाहीं. गुरुजी निघून गेले तेव्हां त्यानें प्रत्येकाला त्याच्या त्याच्या नांवानें हांक मारून आपल्याजवळ बोलवलें. मग तो त्यांना सांगूं लागला.

" आज मी तुमचा युवराज आहें. उद्यां राजाधिराज राजा होईन. मग तुम्ही माझी सुद्धां अशी स्तुति कराल. गुरुजीच तुम्हांला शिकवतील कीं; ' राजाधिराज महाराज प्रल्हादराज सर्व शक्तिमान् आहेत. तेच जगदाधार आहेत. ' पण तें खोटं आहे. मी तुमचा मित्र म्हणून तुमच्या हिताचं सांगतों. तुमच्या जन्मजन्मां-

तरीच्या खऱ्या हिताचं सांगतो. गुरूजी शिकवतात तें खोटं आहे. एका परमेश्वराखेरीज स्तुति करण्यासारखे गुण, बाबांतही नाहींत आणि माझ्यांतही नाहींत. आमच्यांत ते कधीं येणारही नाहींत. बालसूर्याच्या तांबुस, तेजस्वी किरणांनीं डोंगरांचे काळे ठिक्कर दगड देखील तापवलेल्या सोन्याच्या कांतीसारखे चकाकतात पण सूर्य आपलं खरं तेज फांकूं लागला म्हणजे दगडाचं काळं रूप दिसूं लागतं. अधिकारी समर्थ मनुष्याचं रूप तसं आहे."

त्यानें आपल्या मित्रांना असें पुष्कळ सांगितलें. त्यांतल्या कांहीं हुशार मुलांनीं निरनिराळ्या शंका काढल्या. त्या त्यानें इतक्या चांगल्या तऱ्हेनें दूर केल्या कीं, जणूं कांहीं एखादा अधिकारी ऋषीच त्या दूर करतो आहे असें मुलांना वाटलें.

"इतके दिवस तूं आमच्यांत शिकत होतास. आमच्यासारखेंच तूं म्हणत होतास आणि आजच तुला हें एवढं ज्ञान कसं आलं ?" असेंही एका मुलानें विचारलें तेव्हां तो म्हणाला.

"तुझं म्हणणं अगदीं खरं आहे. गुरुजींचे शब्द मी उच्चारत होतो, पण ते सर्वस्वी खरे वाटत नव्हते. ते उच्चारतांना मी घोटाळत होतो, पण मनांतल्या मनांत बुद्धीचा उडालेला हा गोंधळ नीट समजत नव्हता तो आज समजला."

तो कसा समजला—मनाचा गोंधळ उडण्यासारख्या विचारांचे संस्कार आपल्या पिंडावर कसे झाले होते ती सगळी हकीगत त्यानें त्यांना सांगितली. मुलांची खात्री झाली, मग ते सगळेच प्रल्हादाच्या पुढारीपणाखालीं भगवान् विष्णूचें भजन करूं लागले.

प्रल्हादाचा आनंद गगनांत मावेना. हिरण्यकशिपूच्या अवास्तव स्तुतीनें, आणि भगवान् विष्णूच्या द्वेषपूर्ण निंदेनें गर्जत असलेला तो आश्रम, आतां भगवान् विष्णूच्या भजनानें घुमूं लागला.

पण त्यानें शंड आणि अमर्क गुरुजींची कोण त्रेधा उडाली. सगळा आश्रमच्या आश्रम एका क्षणांत राजद्रोही झालेला पाहून त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलें. आश्चर्यापेक्षां त्यांना संताप आला. आणि स्वतः प्रल्हादच मुलांना हा राजद्रोह शिकवतो आहे, हें समजल्यावर तर त्यांची भीतीनें गाळणच उडाली. कारण प्रल्हादासारख्या गुडघ्याएवढ्या पोरांना असली अक्कल गुरुजींच्या शिकवण्याखेरीज यायची नाहीं असेंच हिरण्यकशिपूला वाटणार आणि मग मात्र आपली धडगत नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें. दुसऱ्यांनीं कांहींतरी तिखट मीठ लावून विचित्र तऱ्हेनें सांगण्यापेक्षां आपणच प्रत्यक्ष जाऊन महाराजांना ही सगळी हकीकत सांगावी अशा उद्देशानें ते महाराजांकडे धांवत आले आणि घडलेली हकिकत सांगून ते म्हणाले.

" महाराज तें आम्हीं नाहीं शिकवलं. युवराजांच्या डोक्यांत तें खूळ कोणी भरवलं तें आम्हांला माहीत नाहीं. आम्हीं अगदीं अगदीं दोषी नाहीं."

त्यांच्या त्या सांगण्यापेक्षां प्रल्हाद अजून जिवंत आहे हेंच ऐकून हिरण्यकशिपूला आश्चर्य वाटलें. आश्चर्यापेक्षां त्याला राग आला. त्या भरांत तो ओरडून म्हणाला.

" तो जिवंत आहे अजून ?"

त्याच्या त्या ओरडण्यानें शंडामर्क भेदरून गेले. हिरण्यकशिपू पहिल्याच कर्कश सुरांत पुढें म्हणाला.

" तो जिवंत कसा आहे ? मी त्याचा कडेलोट केला होता."

शंडामर्क घोटाळ्यांत पडले. त्याच्या बोलण्याचा त्यांना अर्थच समजला नाहीं. हिरण्यकशिपू पुढें बोलूं लागला.

" तो आश्रमांत आहे ? तो विष्णूचं भजन करतो आहे ? तुमचे सगळे शिष्य त्याच्याबरोबर विष्णूचं भजन करताहेत ! तोही

तुमचं ऐकत नाहीं आणि तुमचे शिष्यही तुमचं ऐकत नाहींत? इतके उद्दाम झाले आहेत सगळे?"

हिरण्यकशिपू शंडामर्काला विचारीत होता, पण तो त्यांच्या उत्तराची अपेक्षा करीत नव्हता. ते नुसते 'हो' 'हो' अशा माना हलवीत होते. हिरण्यकशिपू बोलतच होता. त्यानें आपल्या सेनानायकाला हाक मारून सांगितलें.

"जा आत्तांच्या आत्तां जा. हजार दोन हजार सैनिक घेऊन जा. शंडामर्कांच्या पाठशाळेला वेढा द्या. सगळयांना चांगले झोडपीत घेऊन या. विष्णूचं भजन करणाऱ्या त्यांच्या जिभाच छाटून टाकतों मी."

## ८ जन्मदात्यानं लोटलं–जगत्पित्यानं झेललं

हिरण्यकशिपूच्या आज्ञेप्रमाणें त्याचा सेनानायक हजार दोन हजार सैनिक घेऊन धांवत पळत आश्रमाकडे आला. सैनिकांनीं आश्रमाला वेढा दिला. मग शंडामर्क आणि सेनानायक आश्रमांत शिरले. पहातात तों काय, सगळा आश्रम ओस पडलेला. तेथें प्रल्हादही नव्हता आणि विद्यार्थीही नव्हते. शंडामर्क आणि सेनानायक इतके भेदरून गेले कीं, आतां काय करावें हें त्यांना समजेना. कारण प्रल्हाद आणि विद्यार्थी सापडले नाहींत तर महाराज आपलींच डोकीं उडवतील ही त्यांची खात्री होती. शंडामर्क तर रडूंच लागले.

पण सेनानायक क्षणा दोन क्षणांत भानावर आला. त्यानें शंडामर्कांना धीर दिला.

"तुम्हीं अगदीं घाबरूं नका गुरुजी, अहो, हीं पोरं जाणार जाणार म्हणजे कुठं जाणार. सगळी पृथ्वी पालथी घालून एका प्रहराच्या आंत त्या पोरट्यांना मी पकडून आणतों पहा."

मग सेनानायकानें चारी दिशांना सैनिक पाठवले, आणि स्वतः पूर्व दिशेनें निघाला. पण त्याला पृथ्वी पालथी घालण्याची

जरूर पडली नाहीं. त्याच्या सैनिकांची घोडधांवच अकस्मात् मंदावली. सैनिकांच्या हातांतले घोड्यांचे लगामही सैल झाले. सेनानायकाचाही घोडा आतां तालबद्ध पावलें टाकूं लागला. कारण देवाच्या भजनाचा अतिशय गोड सूर त्यांना ऐकूं येत होता, त्यानें तीं माणसें आणि जनावरें मुग्ध होऊन त्या आवाजाच्या अनुरोधानें जात होती. एके ठिकाणीं त्या सगळ्यांनीं वेढा घातल्या-सारखें रिंगण धरलें. सेनानायकहि क्षणभर मुग्ध झाला.

एका विशाल वडाच्या झाडाखालीं प्रल्हाद बसला होता. त्याच्याभोंवतीं आश्रमांतले त्याचे सगळे विद्यार्थी मित्र बसले होते. प्रल्हाद स्वतः विष्णूचें भजन करीत होता. आणि त्याच्याच मुखांतून निघालेली भजनाची ओळ बाकीचे विद्यार्थी पुन्हां म्हणत होते. त्यांत ते सगळे अगदीं तल्लीन झाले होते. त्या सैनिकांना आणि सेनानायकाला प्रल्हाद म्हणाला.

"या-या-उतरा-बसा खालीं. भगवान् विष्णूच्या नाम-गानाचं मिळणारं सुख तुम्हींसुद्धां घ्या."

तो सेनानायक भानावर आला आणि आपल्या सैनिकांना म्हणाला.

"बघत काय उभे राहिला? चाबकाचे फटके देत उठवा सगळ्यांना! झोडपीत घेऊन चला त्यांना महाराजांसमोर."

तें ऐकण्यावरोबर प्रल्हाद आवेशानें उठला आणि त्यांना दरडावून म्हणाला.

"चूप-चूप-भगवान् विष्णूच्या सामर्थ्यावर मी आज्ञा करतों खबरदार पुढें पाऊल टाकाल तर! तुम्हांला आमचं भजन ऐकवत नसेल तर चालते व्हा इथून! मुकाट्यानं गेला नाहींत तर मी हाकलून देईन. विष्णुद्रोही राक्षसांना हाकलून देतांना भक्तांच्या आंगांत इंद्राचं सामर्थ्य येतं. पहा-पहा-चालते व्हा."

असें म्हणत जणूं सैनिकावर झडप घालण्याच्या आवेशांत प्रल्हाद पुढें आला. तें पाहून सैनानायक अगदीं गर्हिवरून दीन, लाचार वाणीनें म्हणाला.

" युवराज-युवराज ते शब्द उच्चारतांना मला किती वेदना होत होत्या त्या मी कशा सांगूं ? महाराजांची आज्ञा मानली नाहीं तर देवांची देखील धडगत नसते तिथें माझी काय दशा होईल ? सांगा. युवराज तुम्हीच मला कांहीं तरी मार्ग सांगा."

प्रल्हादानें सगळें जाणलें. त्यानें त्याची समजूत घातली. त्याला अभय दिलें. प्रल्हादाच्या अभयदानावर तोही विसंबून राहिला.

प्रल्हाद एकटाच राजधानीकडे आला. तो आला तो थेट हिरण्य-कशिपूसमोर येऊन उभा राहिला. त्याला पहातांच हिरण्यकशिपूचा संताप इतका उसळला कीं तो बाकीचें सगळें विसरून गेला. त्यानें प्रल्हादालाच खडसावून विचारलें.

" तूं अजून जिवंत कसा राहिलास ?"

" भगवान विष्णूच्या कृपेनं ! आपल्या आज्ञेनं मारेकरी मांगांनीं मला कड्याखालीं लोटलं पण भगवान विष्णूनीं आपल्या कमला-करांनीं मला झेललं."

" काय ?"

" हूं. जन्मदात्या पित्यानं कड्याखालीं लोटलं आणि जगत्पित्यानं मला अलगद झेललं."

आपल्या तोंडावर आपली, प्रत्यक्ष बापाची हेटाळणी करणाऱ्या, आपल्या हाडवैरी विष्णूची स्तुति करणाऱ्या प्रल्हादाचा हिरण्य-कशिपूला इतका संताप आला कीं, त्यानें त्याच्यावर एकदम झडप घातली. पृथ्वीचे देखील दोन तुकडे होतील इतक्या आवेशानें त्यानें प्रल्हादाच्या मानेवर तरवारीचा वार केला. एवढ्यांत " महाराज महाराज " असा अगदीं रुद्ध, आर्त स्वर त्याला ऐकूं आला.

## ९ " पति पाहिजे, कीं पुत्र पाहिजे ? "

परमेश्वराचीच लीला म्हणायची ! हिरण्यकशिपूनें प्रल्हादावर प्रहार केला. त्याच वेळीं त्याचा हात चळला. " महाराज-महाराज"

अनुक्रम ............
विभाग ............
क्रमांक
नोंद



अशा रुद्ध आर्त स्वरानें हाका मारीत कयाधू तेथें धांवत आली होती. त्या हाकेनेंच हिरण्यकशिपूचा हात चळला कीं काय कोण जाणे ! त्याचा हात चळला आणि त्याचा नेम चुकला. तो आघात प्रल्हादाच्या बाजूला जमिनीवर पडला. त्याबरोबर तिथली जमीन दुभंगली नि तरवारीच दोन तुकडे झाले.

" महाराज–महाराज–मला मारा पण माझ्या प्रल्हादाला मारूं नका."

म्हणत म्हणत तिनें पुढें होऊन प्रल्हादाला जवळ ओढून घेतलें. हिरण्यकशिपूनें संतापानें लाल होऊन त्याला कयाधूच्या हातांतून ओढून घेतलें. पण आपली तरवारच मोडली आहे हें लक्षांत येतांच त्यानें त्याला पुन्हां त्याच आवेशानें कयाधूकडे लोटलें आणि म्हटलें.

" मी नाहीं मारीत. तूंच त्याला मार. ठार मार. तुझ्या हातून मारण्यासाठींच तो वांचला आहे. हाल हाल करून मार. त्याला तडफडत तडफडत मरूं दे. विषारी नागाचं जलाल जहर दे त्याला."

त्यानें लागलीच विषानें भरलेला दुधाचा पेला आणण्यास सेवकाला आज्ञा दिली. त्या प्रत्येक शब्दाबरोबर त्याचा आवाज चढत होता. कयाधूला तें अगदीं असह्य होत होतें.

" नाहीं–नाहीं–माझ्या हातून तें होणार नाहीं. पुत्रवधाचं पातक मी करणार नाहीं. तुम्हालाही करूं देणार नाहीं."

"तो पुत्र नव्हे-मुलाच्या रूपानं शत्रू होऊन जन्माला आला आहे."

" नाहीं–नाहीं महाराज, तो आपल्या वंशाचा दिवा आहे."

" असलं–मग माझी आज्ञा आहे–सगळ्या राक्षस कुळाला आग लावणारा तुझा हा दिवा तूंच मालव-तूंच त्याला ठार मार–घे तो पेला."

सेवकानें आणलेला पेला घेऊन कयाधूच्या हातांत देण्यासाठीं हिरण्यकशिपू पुढें पुढें जाऊ लागला. कयाधू " नाहीं–नाहीं–"

करीत जणूं काय भीतीनें किंकाळी फोडीत मागे मागे जात होती. हिरण्यकशिपूनें मध्येंच ओरडून तिला विचारलें.

"तुला पति पाहिजे कीं पुत्र पाहिजे?–हा विषयाचा पेला तूं तुझ्या हातानं मला तरी दे–नाहींतर त्या पितृद्रोही पोरट्याला तरी दे–आटप–आटप–"

एवढ्यांत प्रल्हादच पुढें झाला. "आई आई" म्हणत त्यानें कयाधूच्या कमरेला मिठी मारली. तिनें त्याला उचलून कडेवर घेतलें. तिचे डोळे भरून आले. त्याच्याकडे एक नजरेनें पहात तिनें त्याला हाक मारली.

"प्रल्हाद प्रल्हाद"

"आई अशी तूं घाबरतेस कां? या विषानं मी मरेन असं का तुला वाटतं? खोटं आहे तें! 'भगवान विष्णूचं नांव घे. विषाचं अमृत होईल-तें तूं आपल्या हातानं दिलंस तर मुलाचा पिंड बनवणारं आईचें अमृतमय दूध होईल–मी मरणार नाहीं अमर होईन."

त्यानें आईची पुष्कळ समजूत घातली आणि अखेरीस तिच्या-कडून तें दूध घेतलें. प्रत्येक घोटाबरोबर तो 'नारायण' 'नारायण' म्हणत होता. विषाचा तो प्रत्येक घोट 'नारायण' अमृत करीत होता. त्याच्यावर विषाचा कांहींही परिणाम होत नाहीं, उलट त्याची कांति खरोखरीच वाढूं लागली आहे हें पाहून कयाधूही त्याच्याबरोबर त्याच्या सुरांत 'नारायण' 'नारायण' म्हणूं लागली.

## १० नृसिंह अवतार

कयाधूनें दिलेलें वीष खरोखरीच अमृत झालें हें पाहून हिरण्य-कशिपूनें प्रल्हादाला स्वतःच ठार मारण्याचा निश्चय केला. खोल-खोल खड्डा काढून त्यांत त्याला त्यानें पुरलें, तरी तो "नारायण" "नारायण" करीत बाहेर आला. त्यानें त्याला समुद्राच्या अगदीं

अनुक्रम ..........
विभाग ..........



[illegible]शीं पुरलें तरी तो "नारायण" "नारायण" करीत [illegible] वर आलाच. सगळी पृथ्वी जळून खाक होईल इतकी प्रज्वलीत खाई करून त्यांत त्यानें त्याला टाकलें; पण प्रल्हादला खाईंत पडण्याबरोबर पाण्याची पखाल टाकल्याप्रमाणें ती खाई एकदम विझली. अखेरीस दिङ्मूढ होऊन हिरण्यकशिपूनें प्रल्हादाला वैतागून विचारलें.

"नारायण—नारायण—तुझा तो नारायण आहे तरी कुठें?"

"कुठें आहे काय विचारतां बाबा? 'प्रल्हाद अगदीं शांतपणें म्हणाला' तो सगळीकडे आहे. इथं आहे-इथं आहे."

"इथं आहे!-इथं आहे-!-इथं आहे?" हिरण्यकशिपू चहूंकडे नाचत विचारीत होता "इथं आहे इथं आहे?-या खांबांत आहे.?"

"आहे-आहे-चहूंकडे आहे-आपण पहाल तिथं तो आहे— खांबांतही आहे."

"तर मग तुझ्या नारायणालाच अगोदर ठार मारतों."

असें म्हणत हिरण्यकशिपूनें त्या खांबावर मोठ्या आवेशानें मूठ मारली. त्याबरोबर सगळें ब्रह्मांड कोसळून पडतें कीं काय असें वाटणारा भीषण कडकडाट झाला. कधींच न ऐकलेला तो अद्भुत आवाज ऐकून हिरण्यकशिपू अगदीं गोंधळून गेला, कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें त्यानें चहूंकडे पाहिलें. तों तो खांब दुभंगून एक विचित्र आकृति त्याच्यापुढें ठाकली. ती आकृति ना नर ना सिंह अशी विचित्र होती. त्या आकृतीनेंच तो विचित्र पण भीषण आवाज तेथें घुमवला होता. "नर-सिंहा"ची ती उग्र मूर्ति पाहून त्याचें अंतःकरण भीतीनें हादरलें. एवढ्यांत नरसिंहाचा तो अवतार आपल्यावर झडप घालायला येतो आहे असें त्याला दिसलें. हिरण्यकशिपूनें सगळें बळ एकवटलें, गदा उचलली, आणि आवेशानें नरसिंहावर धांवला.

दोघांचें युद्ध झालें. त्यांत नरसिंहानें हिरण्यकशिपूला जेरीस

आणलें. संधि साधून त्यानें त्याच्यावर अकस्मात् झडप घातली. त्याला उचलून घेतलें. दाराच्या उंबऱ्यावर नेलें. तेथें मांड ठोकून त्यानें त्याला आपल्या मांडीवर घेतलें. आपल्या तीक्ष्ण नखांनीं त्यानें त्याचें पोट फाडलें, आंतडीं बाहेर काढून माळेसारखी आपल्या गळ्यांत घातली. * त्रिभुवनाला जिंकणाऱ्या त्या मदोन्मत्त हिरण्यकशिपूला त्या 'नर-सिंह' रूपानें असें नुसत्या नखांनीं ठार मारलें आणि मांडीवरून खालीं फेकून दिलें.

त्याबरोबर देवदेवांनीं, आकाशांतून पुष्पवृष्टि केली. देव, ब्रह्मदेव, इंद्र, ऋषी, मुनि, गंधर्व किन्नर सगळे नृसिंहावताराचें दर्शन घेण्यास तेथें जमले. पण तें रागानें थैमान घालणारें भीषण रूप पाहून त्याच्यापुढें जाण्याचें कोणालाच धैर्य होईना. मग सगळ्या देवांच्या वतीनें ब्रह्मदेवांनीं प्रल्हादालाच सांगितलें.

"बाळ प्रल्हाद, तुझ्यासाठींच भगवान विष्णूंनीं हा उग्र 'नर-सिंह' अवतार घेतला आहे. तूंच त्यांच्याजवळ जाऊन त्यांची प्रार्थना केल्याखेरीज त्यांचें हें अक्राळविक्राळ रूप सौम्य होणार

---

* ही वेळ संधिकालाची होती. सूर्य मावळला होता, पण रात्रही झाली नव्हती. म्हणजे ती वेळ दिवसाचीही, नव्हती, व रात्रीची नव्हती. ती प्रगट झालेली आकृति मनुष्याची नव्हती आणि पशूचीहि नव्हती. तो " नर-सिंहाचा " ( नृसिंह ) अवतार होता. हिरण्यकशिपूला उचलून त्यानें उंबऱ्यावर नेलें. कारण उंबरा म्हणजे घरांतही नाहीं आणि घराबाहेरही नाहीं. त्यानें त्याला आपल्या मांडीवर घेतलें म्हणजे जमिनीवरही नाहीं आणि पाण्यावरही नाहीं. त्यानें आपल्या तीक्ष्ण नखांनीं हिरण्यकशिपूचें पोट फाडून त्याला ठार मारलें. नखें म्हणजे शस्त्रही नव्हे आणि अस्त्रही नव्हे-ती सजीवही नाहींत— आणि निर्जीवही नाहींत-सजीव म्हणावींत तर त्यांना चैतन्य नाहीं, किंवा चलनवलन नाहीं. निर्जीव म्हणावीत तर त्यांना सजीव प्राण्यासारखी वाढ आहे. हिरण्यकशिपूला ब्रह्मदेवानें दिलेल्या वराच्या मर्यादेंत राहून हिरण्यकशिपूचा वध करण्यासाठीं भगवान विष्णूला हा नृसिंहावतार घ्यावा लागला होता.

नाहीं. तूंच प्रार्थना कर-आणि प्रभूचं खरं दर्शन आम्हांला तूंच घडव."

आणि तसेंच झालें. बाळ प्रल्हाद भगवान विष्णूचें गुणगान करीत नरसिंहाजवळ गेला. त्यांना साष्टांग नमस्कार घातला. "भगवंतांनीं आपलं हें रुद्र रूप टाकावं, आणि शंखचक्र-गदा-पद्मधारी असें सोज्वळ तेजस्वी रूप आम्हांस दाखवावं" अशी प्रार्थना केली. भगवंतांनीं त्याची प्रार्थना ऐकली, सगळ्यांना खरें दर्शन दिलें आणि ते प्रल्हाद बाळाला म्हणाले.

"प्रल्हाद, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहे. तुला पाहिजे तो वर माग."

प्रल्हादानें वर मागितला.

"भगवन् मला असा वर द्या कीं, मनुष्य जन्मल्याबरोबर त्याच्यांत निर्माण होणाऱ्या सगळ्या वासनांचा-माझ्यांतही झालेला उद्भव या अंकुरावस्थेंतच नाश होऊं दे-तुझा विसर कधींही होऊं नये-आणि प्रभो, माझ्या वडलांनीं अज्ञानानेंच तुझा द्रोह केला त्यांना क्षमा कर-त्यांना मुक्ति दे."

भगवान विष्णू म्हणाले.

"बाळ प्रल्हाद, हिरण्यकशिपू एकवीस पिढ्यांसह मुक्त झाला आहे. तुझी ही इच्छा पूर्ण होईल. तूं वासनारहित होऊन रहाशील. पण हें मन्वंतर * संपेपर्यंत तूं दैत्यांचा राजा होऊन भूलोकावर सत्ता गाजवशील."

प्रल्हादाला राज्याभिषेक झाला, पुढें त्याचें लग्न झालें. त्याला विरोचन नांवाचा एक मुलगा व विरोचना नांवाची एक मुलगी होऊन त्याचा दैत्यवंश अखंड राहिला.

★

---

* ४३ लाख २० हजार वर्षें म्हणजे — —
आणि ५१ पर्याय म्हणजे

IRBK-0106254

६२.६७

IRBK-0106254

# वाचतां वाचतां मुलें [illegible] ज्ञातात

## अयोध्येचा राजा

अयोध्येचा राजा हरिश्चंद्र हा [illegible] पुतळा होता. राणी तारामती आणि पुत्र रोहिदास म्हणजे स्त्री-पुत्राचा आदर्श होय! राजा हरिश्चंद्राला सत्त्वरक्षणासाठीं किती हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्यांचें हृदयद्रावी वर्णन वाचा! डोळयांत गंगायमुना उभ्या रहातात.

लेखक : धों. वि. सप्रे : तिरंगी मुखपृष्ठ : मूल्य ५० नवे पैसे

## कच देवयानी

दारूच्या व्यसनामुळें शुक्राचार्यासारख्या गुरु-श्रेष्ठांचीही प्रतिज्ञा भंग पावली. लहान मुलांनीं ही गोष्ट वाचल्यावर तीं जन्मांत दारूला स्पर्श करणार नाहींत. दारूबंदीच्या प्रचारासाठीं सरकारनें या पुस्तकाच्या शाळेंतील लहान मुलांना व कामगारांना हजारों प्रति वाटाव्यात.

लेखक : शिवराम वाशीकर : सुंदर मुखपृष्ठ : मूल्य ३० नवे पैसे

## दुश्यंत शकुंतला

कालिदासाच्या सर्व नाटकांमध्यें शाकुंतल नाटक श्रेष्ठ मानतात. त्या नाटकाची ही गोष्ट रुपेरी पडद्यावर जशी पुन्हा पुन्हा पहावीशी वाटली तशीच ही पुस्तिकाही पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटते.

लेखक : रत्नाकर वाशीकर : तिरंगी मुखपृष्ठ : मूल्य २५ नवे पैसे

## नामांकित नटनटी

आजकाल रुपेरी पडद्यावर झळकणाऱ्या नटनटींचीं हीं शब्दचित्रें तरुण-तरुणींना कादंबरीपेक्षांही मनोरंजक वाटतात. कलावंतांचीं छायाचित्रें.

लेखक : भाई भगत : पृष्ठें ८० : आकर्षक मुखपृष्ठ : मूल्य ५० न. पैसे

या बोधचिन्हाचीं पुस्तकें स्वस्त व सुंदर असतात

या बोधचिन्हाचीं पुस्तकें उपयुक्त व आकर्षक असतात

या बोधचिन्हाचीं पुस्तकें लहान—थोरांना आवडतात

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई 2

मुखपृष्ठ छपाई :- हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४